PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Sakhha bhau pakka vairi
Year: 2008

Song: Punyayichya payakhali
Lyricist: Jagdish Khebudkar

पुण्याईच्या पायाखाली
जमीन का फाटली
पुण्याईच्या पायाखाली
जमीन का फाटली
विठू तुझ्या मायेची का
चंद्रभागा आटली
विठू तुझ्या मायेची का
चंद्रभागा आटली
आ... आ... आ...
आ... आ... आ...

एकाएकी असे का रे विपरीत झाले
पंढरीच्या वाटेवरी मरण का आले
बुक्क्याची ही धुळ आज
मातीला का भेटली
बुक्क्याची ही धुळ आज
मातीला का भेटली
विठू तुझ्या मायेची का
चंद्रभागा आटली
विठू तुझ्या मायेची का
चंद्रभागा आटली
आ... आ... आ...
आ... आ... आ...
वठलेल्या झाडाची या सावली मिळेना
देव नाही देवळात आरती जुळेना
अभंगाची सुरावट गळ्यामधी गोठली
अभंगाची सुरावट गळ्यामधी गोठली
विठू तुझ्या मायेची का
चंद्रभागा आटली
विठू तुझ्या मायेची का
चंद्रभागा आटली
आ... आ... आ...
आ... आ... आ...

दिंडीची या झाली आज
अशी प्रेत यात्रा
भजनाचे रूप आले मरणाच्या मंत्रा
चंदनाच्या लाकडात कुडी आज पेटली
चंदनाच्या लाकडात कुडी आज पेटली
विठू तुझ्या मायेची का
चंद्रभागा आटली
विठू तुझ्या मायेची का
चंद्रभागा आटली
आ... आ... आ...
आ... आ... आ...

पिता होऊनी हा पुत्र संसारात राही
वात्सल्याचे दान आता पदरात घेई
क्रियाकर्म करताना भावभक्ती दाटली
क्रियाकर्म करताना भावभक्ती दाटली
विठू तुझ्या मायेची का
चंद्रभागा आटली
विठू तुझ्या मायेची का
चंद्रभागा आटली
आ... आ... आ...
आ... आ... आ...

सावडली राख आता अश्रुंनी भिजावी
दिसामागे दिस जाता ज्योत ही पुजावी
पिंडदानाची ही आशा कावळ्याला वाटली
पिंडदानाची ही आशा कावळ्याला वाटली
विठू तुझ्या मायेची का
चंद्रभागा आटली
विठू तुझ्या मायेची का
चंद्रभागा आटली
पुण्याईच्या पायाखाली
जमीन का फाटली
पुण्याईच्या पायाखाली
जमीन का फाटली
विठू तुझ्या मायेची का
चंद्रभागा आटली
विठू तुझ्या मायेची का
चंद्रभागा आटली
विठू तुझ्या मायेची का
चंद्रभागा आटली

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*